कोल्हापूर महिला सहकारी बँक लि, कोल्हापूर

मुख्य कार्यालय - १०८२ ख बी वॉर्ड तुतूची बाग, खासबाग, कोल्हापूर. फोन २५५०४२१/२२ Email:ho@kopmahilabank.com

वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस (फक्त भागधारक सभासदांसाठी)

आपल्या बँकेची सन २०२४-२०२५ चे अहवाल सालची ५२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक ०४ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता राजर्षी छत्रपती शाहू स्मारक भवन, दसरा चौक, कोल्हापूर येथे भरणार असून या सभेत खालील विषयावर विचार-विनिमय करण्यात येणार आहे. तरी सदर सभेस आपण वेळेवर उपस्थित रहावे, अशी विनंती आहे.

● सभेपुढील विषय ●

१) दिनांक २३ ऑगष्ट,२०२४ रोजी संपन्न झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.

२) सन २०२४-२०२५ सालचे प्रतिवृत्त, ताळेबंद व नफा-तोटा पत्रके स्विकृत करणे व मंजुरी देणे.

३) संचालिका मंडळाने सुचविलेले सन २०२४-२०२५ अखेरच्या नफा विभागणीस व लाभांश जाहीर करुन वितरणास मंजूरी देणे.

४) सन २०२४-२०२५ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास आणि सन २०२५-२०२६ चे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रकास मंजूरी देणे आणि प्रगती तक्त्याची नोंद घेणे.

५) सन २०२३-२०२४ च्या वैधानिक लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवालावर चर्चा करणे व अहवाल स्विकारणे.

६) वैधानिक लेखापरिक्षक मे. जे.पी.चौगुले ॲण्ड कंपनी सी. ए. कोल्हापूर आणि अंतर्गत लेखापरिक्षक मे. सुधाकर कुलकर्णी ॲण्ड कंपनी, सी.ए. सातारा यांचेकडून सन २०२४-२०२५ सालाकरिता आलेल्या अहवालावर विचार करणे.

७) सन २०२५-२०२६ करिता वैधानिक लेखापरिक्षकांचे नेमणुकीबाबत संचालक मंडळाने शिफारस केलेनुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया यांचे निकषास अधीन राहून नेमणुक करणे व मेहनताना ठरविणे.

८) बँकेच्या संचालिका मंडळ सदस्या व त्यांचे नातेवाईक यांच्या सन २०२४-२०२५ साल अखेर येणे असलेल्या कर्जाची नोंद घेणे.

९) महाराष्ट्र शासनाच्या "एक रक्कमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत" सवलत दिलेल्या थकीत कर्ज खात्यांची माहिती घेणे व संचालिका मंडळाच्या निर्णयाची नोंद घेणे.

१०) शाखा निगवे (दुमाला) ता. करवीर येथे नवीन शाखा सुरु करणेबाबत घेतलेल्या निर्णयाची नोंद घेणे.

११) वार्षिक सर्वसाधारण सभेस सभासदांच्या अनुपस्थितीस माफी देणेबाबत विचार करणे.

१२) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

स्थळ : कोल्हापूर

दिनांक : ३०/०७/२०२५

मान. संचालिका मंडळाचे आज्ञेवरुन

(जे.के.कुंभार)

महाव्यवस्थापक

महत्त्वाची सूचना :

अ) गणसंख्येअभावी सभा-तहकूब झालेस सदर सभा त्याच दिवशी वरील ठिकाणी अर्ध्या तासाने सुरु होईल आणि या सभेस गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.

ब) बँकेचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक आणि लेखापरिक्षण अहवाल बँकेच्या मुख्यालय आणि शाखा कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द केलेला आहे. अहवाल प्रत बँकेच्या मुख्यालयातून लेखी मागणी करुन उपलब्ध होईल. नोटीस व आर्थिक पत्रके बँकेच्या वेबसाईटवर पाहणेस उपलब्ध आहेत.

क) या सभेच्या विषयासंदर्भातील विचारावयाचे प्रश्न दिनांक २५/०८/२०२५ पर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयात महाव्यवस्थापक यांचेकडे लेखी द्यावयाचे आहेत.

ड) उपस्थित सभासदांना सभेस उपस्थित राहील्याबद्दल उपस्थिती प्रमाणपत्र देणेत येणार आहे. सभासदांनी सभेस येताना सभा नोटीस व बँक ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.

श्रध्दांजली :

अहवाल सालात बँकेचे जे सभासद, ठेवीदार, खातेदार, ग्राहक, हितचिंतक, संशोधक, शास्त्रज्ञ, साहित्यिक, लेखक, कलावंत, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, बँकीग व सहकार क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती दिवंगत झालेल्या आहेत. त्यांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करुन सर्वांचे आत्म्यास सद्गती व चिरंतन शांती लाभो, अशी ईश्वर चरणी प्रार्थना करुया.

सन २०२४-२०२५ चे प्रतिवृत्त :

सन्माननीय सभासद बंधू/ भगिनीनो,

आपल्या बँकेच्या ५२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थीत असणाऱ्या सर्व सभासद बंधु/भगिनीचे मी संचालिका मंडळाच्यावतीने स्वागत करते.बँकेची १०० कोटी ठेव उद्दिष्ट पुर्तता आणि परिपुर्ण डिजीटल बँकिंग सेवेचे सन २०२४-२५ अहवाल सालाचे बँक कामकाजाचे प्रतिवृत्त, ताळेबंद व नफा-तोटापत्रक इत्यादी आर्थिक पत्रके आजच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत आपणासमोर सादर करताना मला विशेष आनंद होत आहे.

दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशन लि. मुंबई या राज्यातील नागरी सहकारी बँकांच्या शिखर संस्थेने सन २०२३-२०२४ च्या आर्थिक वर्षातील कामाबद्दल आपल्या बँकेस महिला बँक गटात संपुर्ण महाराष्ट्रातून राजमाता जिजाऊ उत्कृष्ट महिला सहकारी बँक पुरस्कार देवून सन्मानित केलेले आहे, बँकेच्या आजपर्यंतच्या गौरवपूर्ण यशामध्ये सहभागी असलेल्या संचालिका मंडळ, अधिकारी, सेवक, सभासद, ठेवीदार, खातेदार, ग्राहक व हितचिंतकांचे अभिनंदन करते.

तुलनात्मक सांपत्तिक आकडेवारी:

दिनांक ३१ मार्च, २०२५ अखेरची तुलनात्मक सांपत्तिक आकडेवारी खालील प्रमाणे आहे.

(आकडे लाखांत)

अ. नं.	तपशील	३१/०३/२०२४	३१/०३/२०२५	वाढ/घट
१	सभासद संख्या	१२२९६	१२३३०	+३४
२	भाग भांडवल	४७७.७०	५१२.८०	+३५.१०
३	रिझर्व्ह व इतर फंड	१२०३.६०	१२३५.६६	+३२.०६
४	ठेवी	९८९७.२६	१०१०७.३१	+२१०.०५
५	गुंतवणूक	५०७९.५५	५००४.७३	-७४.८२
६	कर्जे	५९६८.४८	६४७०.४६	+५०१.९८
७	नफा	७४.६४	८०.८१	+६.१७
८	खेळते भांडवल	११९०३.४५	१२१९६.९२	+२९३.४७
९	सी. आर. ए. आर. प्रमाण	१७.६९%	१९.००%	+१.३१%
१०	थकबाकी प्रमाण	८.३४%	६.८१ %	-१.५३%
११	निव्वळ एन. पी. ए. प्रमाण	०.००%	०.००%	-०.००%

अहवाल सालअखेर १२३३० सभासद आहेत. अधिकृत भाग भांडवल रु. १० कोटी असून वसूल भाग भांडवल रु.५१२.८० लाख आहे. राखीव व इतर निधी रु.१२३५.६६ लाख आहे. नेटवर्थ रु. १०८५.३८ लाख आहे. नागरी बँकांसाठी सीआरएआर किमान प्रमाण ९ % अनिवार्य आहे. आपल्या बँकेचे सीआरएआर प्रमाण १९% आहे. ठेव संकलन आणि कर्ज वितरणात वाढ झालेली आहे. तरलता, योग्य परतावा आणि जोखमीचे विकेंद्रीकरण विचारात घेवून सरकारी रोखे, म्युच्युअल फंड, आणि सक्षम शेड्युल्ड बँकांच्या मुदत ठेवीत एकुण रु.५००४.७३ लाख गुंतवणूकी केलेल्या आहेत. सरकारी रोख्यांचे बाजारभावात वाढ झाली नसलेने व्याजाव्यतिरिक्त रोखे खरेदी- विक्री व्यवहारातून उत्पन्न मिळालेले नाही. गुंतवणूक घसारा निधी रु.१३४.११ लाखाची तरतूद केलेली आहे. गुंतवणूक चढ-उतार निधी रु.२३.६५ लाख इतका आहे. खेळते भांडवल रु.१२१९६.९२ लाख आहे. अहवाल सालात रु.८०.८१ लाख इतका निव्वळ नफा झालेला आहे. थकबाकीचे प्रमाण ६.८१% आहे. विशेष म्हणजे निव्वळ एनपीए प्रमाण शुन्य टक्के ठेवणेत यश आलेले आहे.

नफा विभागणी :

रिझर्व्ह बँक, सहकार खाते आणि आयकर विभागाच्या मार्गदर्शक सुचनाप्रमाणे ठेवीवर आकर्षक व्याज, किफायतशीर कर्ज व्याजदर, नियोजनबध्द गुंतवणूकी, आवश्यक पुरेशा तरतुदी आणि व्यवस्थापकीय खर्च करुन सन २०२४-२५ साल अखेर रु. ८०,८०,८१८.२८ इतका निव्वळ नफा झालेला आहे. सभासदांना १०% लाभांशांची शिफारस केलेली आहे. संचालिका मंडळाने खालील तपशीलाप्रमाणे नफा विभागणीस शिफारस केली आहे. त्यास आपण मंजूरी द्यावी अशी विनंती करते.

तपशिल	रुपये	पैसे
चालू वर्षाचा नफा	८०,८०,८१८	२८
नफा विभागणी		
- २५ टक्के राखीव निधी	२०,२०,२०४	७६
-१० टक्के लाभांश	४७,९७,२२२	००
- गुंतवणूक चढ-उतार निधी	१२,६३,३९१	५२

ठेवी :

सभासद आणि ठेवीदारांच्या विश्वासार्हतेमुळे अहवाल सालात बँकेने १०० कोटी ठेवीचा टप्पा पार केलेला आहे. ३१ मार्च, २०२५ अखेर एकूण रु.१०१०७.३१ लाख ठेवी आहेत. मागील वर्षाच्या तुलनेत रु.२१०.०५ लाख ठेवीत वाढ झालेली आहे. कासा ठेवीचे प्रमाण २२.९२% आहे. व्यक्ती / संस्था करीता सेव्हींग, चालु, रिकरिंग, पिग्मी, मुदतबंद, पुनर्गुतवणूक दामदुप्पट, दामदिडपट अशा आकर्षक व्याजदराच्या विविध ठेव योजना आहेत. जेष्ठ नागरिकांच्या एक वर्षावरील ठेवी, एक रक्कमी रु.१५.०० लाख ठेव पावती करणारे ठेवीदार आणि संस्था ठेवींना पाव टक्के जादा व्याज दिले जाते. **बँकेकडे ठेवलेल्या रु. ५ लाखापर्यंतचे ठेवीस विमा संरक्षण आहे.** माहे सप्टेंबर,२०२५ अखेरचा विमा हप्ता ठेव विमा महामंडळाकडे दिनांक ०६/०५/२०२५ रोजी भरलेला आहे. सभासद/खातेदारांनी विविध ठेव योजनांचा लाभ घ्यावा.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार सेव्हींग, चालू आणि इतर ठेव खातेवर नियमीत व्यवहार केले नसलेस असे खाते दोन वर्षानंतर अन-ऑपरेटिव्ह होते आणि खातेवर सलग १० वर्षे व्यवहार केले नसलेस खातेची रक्कम रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे डिफ फंडास पाठविली जाते. तेंव्हा खातेदारांनी आपल्या खात्यावर नियमित व्यवहार करावेत,ठेव खातेस वारस (Nomination) नोंदी कराव्यात आणि आपल्या खात्याची वेळेत केवायसी/सीकेवायसी/फेरकेवायसी पुर्तता करुन द्यावी अशी विनंती करते.

कर्जे :

३१ मार्च, २०२५ अखेर २१६१ कर्जदारांचे कडून रु.६४७०.४६ लाख इतकी कर्जे येणे आहेत. रिझर्व्ह बँकेच्या सुधारीत मार्गदर्शक सुचनेप्रमाणे नागरी बँकांची अग्रक्रम क्षेत्र कर्ज वितरण मर्यादा ६०% आणि दुर्बल घटक कर्ज मर्यादा १२% आहे. आपल्या बँकेने एकूण कर्ज वितरणा पैकी ८१.७२% अग्रक्रम क्षेत्रास आणि त्यापैकी २५.१९% दुर्बल घटकांना कर्जे दिलेली आहेत. बँकेच्या एकूण कर्ज वितरणापैकी रु.२५ लाखावरील कर्जे ही ५०% पेक्षा कमी असावीत अशा रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचना आहेत, त्याचे पालन बँकेने केले आहे. कागदपत्राची परिपूर्ण छाननी आणि सुरक्षितता विचारात घेवून अग्रक्रम क्षेत्रात समाविष्ट होणाऱ्या उत्पादक कारणांसाठी लहान रक्कमांची कर्जे वितरीत करणेचे संचालिका मंडळाचे धोरण आहे. अन्य बँकांच्या तुलनेत कर्ज व्याजदर योग्य प्रमाणात ठेवलेने कर्ज वितरणात वाढ होईल अशी आमची खात्री आहे.

बँकेकडे गृह कर्ज, शैक्षणिक कर्ज, व्यावसायिक कर्ज, वाहन खरेदी कर्ज,सौरउर्जा उपकरणे खरेदी कर्जे, शेती व शेतीपुरक व्यवसायाकरीता कर्जे, सोने जिन्नस, ठेवी, विमा पॉलीसी, राष्ट्रीय बचतपत्र तारण, व्यापारी आणि व्यावसायिकांसाठी तारणी/विनातारणी कॅश क्रेडीट, पगारदार नोकरासाठी विनातारणी कर्ज अशा कमीत-कमी व्याजदराच्या कर्ज सुविधा उपलब्ध आहेत.आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ आणि इतर मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळ योजना सुरु आहेत. महिलांकरिता पर्यटन व्यवसायासाठी '**आई**' ही व्याज परतावा योजना सुरु करीत आहोत. कॅश क्रेडीट खातेदारांना क्रेडीट रेटींग व्याजदर पध्दत सुरु आहे. पुढील काळात मुदती कर्जास क्रेडिट रेटिंग पध्दत सुरु करणेचा विचार करीत आहोत. तेव्हा सभासद व खातेदारांनी विविध कर्ज योजनांचा लाभ घ्यावा, अशी मी विनंती करते.

थकबाकी/एन.पी.ए.:

३१ मार्च, २०२५ अखेर ५२७ थकबाकीदारांचेकडून रु.४४०.९० लाख इतकी थकबाकी येणे आहे. त्यापैकी १४४ थकबाकीदारांवर लवाद दावे दाखल केले आहेत. पैकी १३२ थकबाकीदारांचे रु.३४३.१६ लाख इतक्या रक्कमेचे हुकुमनामे बँकेस मिळालेले असून १२ थकीत कर्जदारांचे रु.३५.९३ लाख रक्कमेचे दावे मे. न्यायालयात प्रलंबीत आहेत. थकबाकीचे येणे कर्जाशी प्रमाण ६.८१% आहे. अहवाल साल अखेर १४८ थकबाकीदारांची रु.५१७.२४ लाख इतक्या रक्कमेची एनपीए कर्जे येणे आहेत. ढोबळ एनपीए कर्जाचे प्रमाण ७.९९ % आहे. रिझर्व्ह बँकेच्या निकषांप्रमाणे रु.५५७.१४ लाख बुडीत कर्ज निधीची तरतुद केलेली आहे. निव्वळ एनपीए कर्जाचे प्रमाण शुन्य टक्के आहे.

बँकेच्या काही थकबाकीदारांना थकबाकी भरणेस विनंती करुनही त्यांनी वसुलीस प्रतिसाद दिला नसलेने नाईलाजास्तव त्यांचेवर लवाद दावे आणि सिक्युरिटायझेशन कायद्या अंतर्गत कारवाई केलेली आहे. रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सुचने प्रमाणे कर्ज खात्यांचा थकीत कालावधी विचारात घेवून एसएमए/एनपीए वर्गिकरण दैनिक पध्दतीने होत असते. त्या आधारे थकबाकी वसूलीची पुढील कार्यवाही केली जात आहे. मुख्यालय आणि शाखास्तरावरील अधिकाऱ्यांचे शाखानिहाय वसुली पथक थकबाकी वसुलीचे काम करीत आहे. महाराष्ट्र शासनाने थकबाकीदारांकरीता एक रक्कमी कर्ज परत फेड योजना लागू केलेली आहे. या योजनेचा थकबाकीदारांनी लाभ घ्यावा. थकबाकी वसुलीचे कायदेशीर कटु प्रसंग टाळणेसाठी थकबाकीदारांनी कर्जाचे हप्ते नियमित भरावेत आणि आपला सीबील स्कोअर व पतमुल्यांकन वाढवावे. असे मी आवाहन करते. नियमीत हप्ते भरणाऱ्या कर्जदारांचे आभार मानते.

लेखापरिक्षण व तपासणी :

बँकेचे सन २०२४-२५ चे वैधानिक लेखापरिक्षण मे. जे.पी.चौगुले अँण्ड कंपनी, चार्टर्ड अकौटंट, कोल्हापूर यांनी पुर्ण केलेले आहे. अहवाल सालाकरिता त्यांनी बँकेस '**अ**' वर्ग दिलेला आहे. समवर्ती लेखापरिक्षण मे. सुधाकर कुलकर्णी अँण्ड कंपनी, चार्टर्ड अकौटंट, सातारा यांनी केलेले आहे. टॅक्स ऑडीट मे. दिलीप फडणीस आणि कंपनी, चार्टर्ड अकौंटट, कोल्हापूर यांनी केलेले आहे. लेखापरिक्षकांनी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल, मी सर्वांचे आभार मानते. सन २०२५-२६ करीता वैधानिक लेखापरिक्षक म्हणून मे. जे. पी. चौगुले अँण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटट, कोल्हापूर यांचे नेमणुकीस रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने मंजुरी दिलेली आहे. वैधानिक लेखापरिक्षक नेमणूकीचा विषय सभेपुढे नोंद घेणे कामी ठेवलेला आहे.त्यास मान्यता द्यावी.

☞ आपली व्यक्तीगत माहिती किंवा आर्थिक व्यवहार विचारून आपणांस लॉटरी लागली आहे असे सांगणारा कोणत्याही फोन, एसएमएस व ईमेलला उत्तर देवू नका.

माहिती तंत्रज्ञान व संगणकीकरण :

आपल्या बँकेने कोअर बँकींग, रुपे डेबीट कार्ड, युपीआय, पॉज, ई. कॉमर्स, आयएमपीएस, मोबाईल बँकींग, एसएमएस, एसीएच क्लिअरींग, सिटीएस क्लिअरींग, नेफ्ट/आरटीजीएस, सीकेवायसी, आधार कार्ड संलग्न पी.एम. किसान / लाडकी बहिण योजना / गॅस अनुदान जमा करणे, मोबाईल ॲपद्वारे पिग्मी कलेक्शन अशा विविध डीजीटल बँकींग सेवा सुरु केलेल्या आहेत. आपली बँक गुगल पे आणि भीम ॲपला लाईव्ह आहे. बँकेने क्युआर कोडकरीता पेटीएम समवेत टाय-अप केलेला आहे. मे. मायकार्ड कन्सलटन्सी ॲण्ड बीपीओ सोल्युशन प्रा. लि. मुंबई यांचेकडे क्लाऊड बेस डेटा सेंटर आणि डीआर साईट भाडे तत्वावर घेतलेली आहे. खातेदारांचे आर्थिक हित आणि डेटा सुरक्षित रहावा याकरीता सायबर हल्यावर नियंत्रण ठेवण्याची दक्षता बँकेने घेतलेली आहे. खातेदारांनी नेहमी काळजीपुर्वक आणि जबाबदारीने डिजीटल सेवा वापरावी. डिजीटल चॅनल वापरताना त्यामध्ये असणाऱ्या धोक्यांचे ज्ञान ग्राहकांना व्हावे याकरीता विविध माध्यमातून सतत जागृती केली जाते. बँकेची www.kopmahilabank.com या नांवे वेबसाईट आहे. विविध ठेव, कर्ज योजना आणि सोयी-सुविधांची माहीती वेबसाईटवर उपलब्ध आहे. खातेदारांचा डीजीटल सेवा वापरणेस चांगला प्रतिसाद आहे. युपीआय व्यवहारात दिवसे-दिवस वाढ होत आहे. यापुढेही जास्तीत-जास्त डिजीटल सेवांचा लाभ घ्यावा, अशी आपणास विनंती करते.

संचालक व समिती सभा :

अहवाल सालात संचालिका मंडळाच्या - २५, कर्ज मंजूरी उपसमिती -२, लेखापरिक्षण उपसमिती-५, थकबाकी वसुली उपसमिती -११, कर्मचारी उपसमिती -२, गुंतवणूक उपसमिती-४ ओटीएस उपसमिती-५, जिंदगी देयता उपसमिती-४ अशा एकूण ५८ सभा संपन्न झालेल्या आहेत. सर्व संचालिकांनी सभेस उपस्थित राहून कामकाजात सहभाग घेतलेला आहे. संचालिका मंडळास बदलत्या बँकींगची माहिती व्हावी याकरिता विविध विषयावर प्रशिक्षण दिलेले आहे. संचालिका मंडळाच्या सहकार्याबद्दल त्यांना धन्यवाद देते. बँकेचा पोटनियम आणि रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार व्यवस्थापन मंडळ स्थापन केलेले आहे. बँकेच्या तज्ञ संचालिका सौ. विजया जाधव यांची कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स असोसिएशनच्या संचालक मंडळावर निवड झालेली आहे, सौ. पूजा जाधव यांना संचालिका मंडळावर तज्ञ संचालिका म्हणून स्विकृत केले आहे, त्यांचे मी अभिनंदन करते.

सेवक व पिग्मी एजंट :

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक सुचना आणि संचालिका मंडळ निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करीत चांगली ग्राहक सेवा देत, बँकेच्या व्यवसायवृध्दीत आणि प्रगतीत सहयोग देत असलेल्या सेवक आणि पिग्मी एजंटांना धन्यवाद देते. सेवक व त्यांचे कुटूंबियांना वैद्यकीय आणि अपघाती विम्याची सुविधा दिलेली आहे. आय.आय.बी. मार्फत घेतल्या जात असलेल्या जेएआयआयबी आणि सीएआयआयबी परीक्षा देणेकरिता सेवकांना नेहमी प्रोत्साहन दिलेले आहे. सेवकांना बँकिंगचे अद्यावत ज्ञान व माहिती व्हावी याकरिता कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चर बँकिंग पुणे, बँक असोसिएशन, बँक फेडरेशन आणि शिवाजी विद्यापीठ अशा मान्यताप्राप्त संस्था मार्फत सेवकांना प्रत्यक्ष/ऑनलाईन पध्दतीने प्रशिक्षण दिलेले आहे. अहवाल सालात व्यवस्थापक श्री. निवास पाटील, अधिकारी श्री. सुनिल व्हटकर, श्री. रविंद्र जाधव, श्री. कृष्णात पाटील, लिपीक श्री. रामदास पोवार आणि शिपाई श्री. रामकृष्ण मगर हे सेवानिवृत्त झालेले आहेत.

शैक्षणिक व सामाजिक कार्य:

बँकेचे सभासद व त्यांचे जवळचे नातेवाईक यांच्या गंभीर आजाराचे उपचारासाठी आणि शस्त्रक्रियेसाठी बँकेमार्फत आर्थिक मदत दिली जाते. जे सभासद एका मुलीनंतर कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया करतील त्यांना प्रोत्साहनपर बक्षीस देणेची योजना आहे. सभासदांच्या ज्या पाल्यांनी १० वी आणि १२ वी च्या परिक्षेत ७० टक्के व त्यापेक्षा जास्त गुण मिळवलेले आहेत, अशा गुणवंत पाल्यांना रोख बक्षीस व प्रशस्तीपत्र दिले जाते.

☞ **बँक तुम्हांला स्क्रीन शेअर करणेचे ॲप डाऊनलोड करायला सांगत नाही.**

संकल्प व समारोप :

केंद्र सरकारचे सहकार खाते आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे नागरी सहकारी बँकांच्या माध्यमातून सामान्य लोकांपर्यंत बँकिंगच्या सेवा-सुविधा देणेचे धोरण आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार आर्थिकदृष्टया सक्षम आणि उत्तम व्यवस्थापन निकष पुर्ण असणाऱ्या नागरी सहकारी बँकांना शाखा उघडणेस परवानगी आहे. आपल्या बँकेने आर्थिकदृष्टया सक्षम आणि उत्तम व्यवस्थापन निकष पुर्ण केलेले असलेने बँकेस एक नवीन शाखा उघडता येते. गतसाली संचालिका मंडळाने नवीन शाखा उघडण्याचा संकल्प केलेला होता. आपणास सांगणेस आनंद होतो की, करवीर तालुक्यातील निगवे (दुमाला) गावच्या पंचक्रोशीतील सभासद / खातेदारांना बँकिंग सेवा-सुविधा देवून त्यांच्या आर्थिक व्यवहाराची सोय व्हावी आणि बँकेची व्यवसायवृध्दी व्हावी, याकरिता लवकरच निगवे (दुमाला) ता. करवीर येथे नवीन शाखा सुरू करीत आहोत.

बँकेच्या शाखा राजारामपूरी आणि पट्टणकोडोली कार्यालयाचे अंतर्गत सजावट व नुतनीकरण केलेले आहे. आता शाखा बिंदू चौक कार्यालयाचे नुतनीकरण काम सुरू आहे. बँकेच्या ठेवी १०० कोटीचे वर असलेने टायर-२ वर्गवारीत बँकेचा समावेश झालेला आहे. टायर-२ निकषांची काटेकोर पुर्तता करीत आपणा सर्व सभासद, ठेवीदार, खातेदार व ग्राहकांना सध्याच्या शाखा आणि नवीन निगवे (दुमाला) शाखेतून बँकेच्या विविध ठेव, कर्ज योजना आणि डिजीटल बँकिंग सेवा देत आहोत. यापुढेही आपण सभासद आणि खातेदारांनी बँकेच्या प्रगतीत आणि व्यवसायवृध्दीत सहभागी व्हावे अशी अपेक्षा

आभार :

रिझर्व्ह बँकेचे अधिकारी, महाराष्ट्र राज्याचे मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, पुणे, मा. विभागीय सहनिबंधक, मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, आयडीबीआय बँक, एचडीएफसी बँक आणि इतर बँका, सहकारी संस्था, नॅशनल फेडरेशन. राज्यस्तरीय फेडरेशन, बँक असोसिएशन यांचे पदाधिकारी/ अधिकारी, बँकेचे सल्लागार आणि मुल्यांकनदार यांनी बँकेस मोलाचे सहकार्य दिलेले आहे. अहवाल सालात विविध शासकीय, निम-शासकीय अधिकारी, मान्यवर व्यक्ती, सभासद, ठेवीदार, कर्जदार, ग्राहक, हितचिंतक यांनी भेटी देवून व्यवहारात सहयोग दिलेला आहे, या सर्वांची मी आभारी आहे.

आपल्या बँकेचे सन २०२४-२०२५ अहवाल सालचे प्रतिवृत, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, नफा विभागणी, पुढील वर्षाचे खर्चाचे अंदाजपत्रक, लेखापरिक्षकांचा अहवाल आणि सन २०२५-२६ करीता वैधानिक लेखापरिक्षक नेमणुक इत्यादी विषय आपणा समोर सादर केले आहेत. त्यास आपण मंजुरी द्यावी अशी संचालिका मंडळाचेवतीने मी आपणास विनंती करते.

-जय सहकार-

संचालिका मंडळाचे वतीने
आपली विनीत,

(सौ. शैलजा उदय सुर्यवंशी)
अध्यक्षा

स्थळ : कोल्हापूर
दि. ३०/०७/२०२५

सभासद व खातेदारांना विशेष विनंती

१) पोटनियमाप्रमाणे सभासदांची क्रियाशील व अक्रियाशील सभासद अशी विभागणी केली जाते. तेव्हा सभासदांनी किमान रुपये १००० चे शेअर्स धारण करावेत, किमान रुपये १०,००० ठेव ठेवावी किंवा रुपये २५,००० कर्ज घ्यावे. पाच वर्षामध्ये किमान एका वार्षिक सभेस उपस्थित रहावे.

२) सभासदांनी आपल्या पत्त्यातील अगर अन्य बदलाची नोंद त्वरीत बँकेकडे द्यावी.

३) ओळखपत्रासाठी आयडेंटीटी कार्ड साईज दोन फोटो देऊन ओळखपत्र तयार करुन घ्यावे.

४) सभासद/ठेव/लॉकर/सोने खातेदाराने सर्व खात्यांवर वारस नोंद (नॉमिनेशन) करणे आवश्यक आहे. वारस नोंदी केल्यास खातेदाराच्या मृत्यू पश्चात त्या खात्यातील रक्कमा / लॉकर मधील वस्तू /सोने जिन्नस वारसांना देणे सोईचे होईल.

५) सेव्हिंग / चालू / इतर ठेव खातेवर नियमीत व्यवहार केले नाही तर दोन वर्षानंतर असे खाते अन-ऑपरेटीव्ह होते. सलग दहा वर्ष व्यवहार केले नाही तर खात्याची रक्कम डिफ फंडाकडे वर्ग होते.म्हणून खातेदाराने खात्यावर नियमीत व्यवहार करावेत. खात्याची वेळेत केवायसी/फेर केवायसी / सी केवायसी ची पूर्तता करावी.

६) बँक ठेव विमा महामंडळाच्या नियमानुसार आपल्या बँकेतील रु. ५,००,०००/- पर्यंतच्या ठेवींना विमा संरक्षण आहे.

७) मार्च-एप्रिल २०२५मध्ये इ.१० वी-१२ वी परिक्षेत ७०% पेक्षा जास्त गुणाने उत्तीर्ण झालेल्या सभासदांच्या पाल्यानी ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत अर्ज व गुणपत्रक बँकेत सादर करावे.

गुंतवणूक/समवर्ती लेखापरिक्षक

मे. सुधाकर कुलकर्णी अँण्ड कंपनी
चार्टर्ड अकौटंट

टॅक्स कन्सलटंट

मे. दिलीप फडणीस ॲण्ड कंपनी
चार्टर्ड अकौटंट

कायदा सल्लागार

ॲड. के. ए. कापसे
ॲड. के. एस. पाटील
ॲड. अंकुश भांदिगरे
ॲड. एल. एस. शहा
ॲड. एन. एम. साळोखे
ॲड. संगिता हुपरीकर (सुर्यवंशी)

मुल्यांकनदार

श्री. ए. व्ही. कदम
श्री. आर. व्ही. फडणीस
श्री. एस. बी. अथणे
श्री. सी.डी. हराळे
श्री. प्रदिप व्ही. कुलकर्णी
श्री. रविराज एस. तांबट

सराफ

श्री. विजय एकनाथ भुर्के श्री. मकरंद चंद्रकांत पोतदार श्री. अल्ताफ मिरासो मुल्ला

बँकर्स

* भारतीय स्टेट बँक, कोल्हापूर
* महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई
* के. डी. सी. सी. बँक लि.,कोल्हापूर
* एच. डी. एफ. सी. बँक, कोल्हापूर
* आय. डी. बी. आय. बँक, कोल्हापूर
* बँक ऑफ इंडिया, कोल्हापूर

खातेदारांनी डिजिटल सेवा वापरताना घ्यावयाची काळजी

- एटीएम, युपीआय, मोबाईल ॲपचा पासवर्ड सतत बदला व गोपनीय ठेवा
- तुमच्या बँक खात्याची माहिती फोनवरून कोणासही सांगू नका.
- तुमचे बँक खाते नियमित तपासत रहा.
- मोबाईल अथवा ई-मेलवर येणाऱ्या कोणत्याही अज्ञात लिंक, इमेज आयकॉन व क्युआर कोडवर क्लिक करू नका.
- कोणतेही अज्ञात ॲप किंवा गेम डाउनलोड करू नका.
- कोणत्याही ठिकाणी बाहेर मोफत वापरण्यास मिळणारे वाय-फाय, इंटरनेट वापरू नका.
- व्हॉटसअप, फेसबुक, इंस्टाग्राम, टेलिग्राम इ. सोशल साईटवर आपली माहिती शेअर करू नका.
- बँक फोन करून तुमचा एटीएम कार्ड, सीव्हीव्ही, ओटीपी नंबर व केवायसीबद्दल माहिती मागत नाही. अशी माहिती तुम्ही एसएमएस, व्हॉटसअप व फोनद्वारे देवू नका
- इतर व्यक्तींना तुमचा पिन नंबर दिसणार नाही, अशा पध्दतीने एटीएम मध्ये नोंद करा.
- बँकेच्या व्यवहाराचा संदेश अथवा एसएमएस मिळण्यासाठी आपला मोबाईल नंबर बँकेत अद्यावत करा.
- सायबर सुरक्षा आणि जनजागृती आता आपली जबाबदारी आहे.
- आपले एटीएम कार्ड स्वत: वापरावे, इतरांना देवू नका.

☞ आपण कोठेही फोन चार्जिंगला लावताना डाटा ट्रान्सफर करावयाचा ऑप्शन बंद करावा अथवा फोन पूर्णपणे बंद करावा.

BALANCE SHEET AS ON 31.03.2025

(Rs. In Lakhs)

CAPITAL & LIABILITIES	भांडवल व देणी	SCHEDULE NO.	AS ON 31.03.2025	AS ON 31.03.2024
Capital	खपलेले भाग भांडवल	1	512.80	477.70
Reserve Fund and Surplus	गंगाजळी व नफा	2	1316.45	1278.24
Deposits	ठेवी	3	10107.31	9897.26
Borrowings	घेतलेली कर्जे	4	0.00	0.00
Other Lia. & Provisions	इतर देणी व तरतुदी	5	739.82	708.33
	Total		**12676.38**	**12361.53**
ASSETS	**जिंदगी**	**SCHEDULE NO.**	**AS ON 31.03.2025**	**AS ON 31.03.2024**
Cash and Balances with RBI	रोख व आरबीआय कडील शिल्लक	6	88.96	169.92
Balances with Banks and Money at Call & Short Notices	इतर बँकातील शिल्लक व कॉल मनी नोटीस	7	1499.75	1586.84
Investments	गुंतवणूक	8	3863.93	3864.55
Advances	कर्जे	9	6470.46	5968.48
Fixed Assets	इमारत जागा व डेडस्टॉक	10	97.74	104.77
Other Assets	इतर येणी	11	655.54	666.97
	Total		**12676.38**	**12361.53**
Contigent Liabilities	संभाव्य देणी व जबाबदाऱ्या	12	**AS ON 31.03.2025**	**AS ON 31.03.2024**
Bank Gurantee	बँक गॅरंटी		15.23	14.36
DEA Fund	डिफ फंड			

PROFIT AND LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31.03.2025

(Rs. In Lakhs)

PARTICULARS	तपशील	SCHEDULE NO.	FOR THE YEAR ENDED 31.03.2025	FOR THE YEAR ENDED 31.03.2024
Income	उत्पन्न			
Interest Earned	व्याज जमा व कसर	13	1011.22	996.78
Other	इतर	14	41.59	39.03
	Total		**1052.81**	**1035.81**
Expendiures	खर्च			
Interest Expended	ठेवी व कर्जावरील व्याज	15	582.52	534.47
Operating Expenses	प्रशासकीय खर्च	16	327.77	349.71
Provisions and Contingencies	तरतूदी	17	61.71	76.99
	Total		**972.00**	**961.17**
Net Profit of the year	वर्ष अखेरचा निव्वळ नफा		80.81	74.64
	Total		**1052.81**	**1035.81**
Appropriations	-		-	-
Balance Profit of Last year	मागील वर्षाचा शिल्लक नफा		0.00	0.00
Current Year Profit	वर्ष अखेरचा निव्वळ नफा		80.81	74.64
Total Profit for Appropriation	एकूण नफा/(तोटा)		**80.81**	**74.64**
	Total			
Appropriations	नफा विभागणी		-	-
Transfer to Statutory Reserves	२५ टक्के रिझर्व्ह फंड		20.20	18.66
Transfer to Dividend	१० टक्के डिव्हीडंड		47.97	46.34
Investment Flucation fund	गुंतवणूक चढ-उतार निधी		12.64	9.64
	Total		**80.81**	**74.64**

☞ अनोळखी व्यक्तीकडून आलेल्या फोन कॉल्सवर विश्वास ठेवू नका.

Schedules to the Financial Statements

(Rs. In Lakhs)

SCHEDULES -1 CAPITAL

Schedules - 1 Capital	31.03.2025	31.03.2024
Particulars	Amount	Amount
Authorised Share Capital (5,00,00,000/- "A" Class shares of Rs. 1000/- each)Issued & paid Up		
Share Rs. 1000/- each fully paid up		
1) Individual	512.80	477.70
2) Co-op Institutions / State Govt.	0.00	0.00
3) Other	0.00	0.00
Total	512.80	477.70
Schedules - 2 Reserve And Surplus		
Particulars	Amount	Amount
1 Statutory Reserve	351.92	326.42
Opening Balance	326.42	306.76
Additions during the year	25.5	19.66
Deductions during the year	0.00	0.00
2 Building Fund	80.06	**80.06**
Opening Balance	80.06	80.06
Additions during the year	0.00	0.00
Deductions during the year	0.00	0.00
3 Dividend Equalization fund	0.00	3.09
Opening Balance	3.09	3.09
Additions during the year	0.00	0.00
Deductions during the year	3.09	0.00
4 Bad and Doubtful Debts Reserve	547.14	**547.14**
Opening Balance	547.14	537.94
Additions during the year	0.00	9.20
Deductions during the year	0.00	0.00
5 Investment Fluctuation Reserve	23.65	**14.02**
Opening Balance	14.02	3.00
Additions during the year	9.63	11.02
Deductions during the year	0.00	0.00
6 Resolution Framework 2.0	0.00	**0.00**
Opening Balance	0.00	0.00
Additions during the year	0.00	0.00
Deductions during the year	0.00	0.00
7 Special Reserve U/s 63(c)of MSCS act 2002	27.00	**27.00**
Opening Balance	27.00	17.00
Additions during the year	0.00	10.00
Deductions during the year	0.00	0.00
8 Charity Fund	0.78	**0.78**
Opening Balance	0.78	0.78
Additions during the year	0.00	0.00
Deductions during the year	0.00	0.00
9 Contingency Fund	23.00	**23.00**
Opening Balance	23.00	23.00
Additions during the year	0.00	0.00
Deductions during the year	0.00	0.00
10 Provision for Slandered assets	29.00	**29.00**
Opening Balance	29.00	18.00
Additions during the year	0.00	11.00
Deductions during the year	0.00	0.00

Particulars	Amount	Amount
11 Staff Welfare fund	1.62	**1.62**
Opening Balance	1.62	1.65
Additions during the year	0.00	0.00
Deductions during the year	0.00	0.03
12 Social Welfare fund	0.00	**0.00**
Opening Balance	0.00	0.00
Additions during the year	0.00	0.00
Deductions during the year	0.00	0.00
13 Investment Depreciation Reserve	134.11	**134.11**
Opening Balance	134.11	134.11
Additions during the year	0.00	0.00
Deductions during the year	0.00	0.00
14 Building revaluation Reserve	0.00	**0.00**
Opening Balance	0.00	0.00
Additions during the year	0.00	0.00
Deductions during the year	0.00	0.00
15 Land Revaluation Reserve	0.00	0.00
Opening Balance	0.00	0.00
Additions during the year	0.00	5.00
Deductions during the year	0.00	0.00
16 Contingent Provision Against	0.00	
Standard Assets	0.00	0.00
Opening Balance	0.00	0.00
Additions during the year	0.00	0.00
Deductions during the year	0.00	0.00
17 General Provision For Loss Reserve	0.00	**0.00**
Opening Balance	0.00	0.00
Additions during the year	0.00	0.00
Deductions during the year	0.00	0.00
18 Standard Covid-19 Reserve	10.00	**10.00**
Opening Balance	10.00	10.00
Additions during the year	0.00	0.00
Deductions during the year	0.00	0.00
19 Special Reserve under Income	0.00	**0.00**
Opening Balance	0.00	0.00
Additions during the year	0.00	0.00
Deductions during the year	0.00	0.00
20 Non Performing Investment	0.00	**0.00**
Opening Balance	0.00	0.00
Additions during the year	0.00	0.00
Deductions during the year	0.00	0.00
21 Member welfare fund	2.36	**2.36**
Opening Balance	2.36	2.37
Additions during the year	0.00	0.00
Deductions during the year	0.00	0.01
22 Computer Fund	5.00	**5.00**
Opening Balance	5.00	5.00
Additions during the year	0.00	0.00
Deductions during the year	0.00	0.00
23 Balance in profit and Loss	80.81	**74.64**
Opening Balance	0.00	0.00
Additions during the year	254.01	279.14
Deductions during the year	173.20	204.50
Total	1316.45	1278.24

Schedules to the Financial Statements

(Rs. In Lakhs)

SCHEDULES -3 DEPOSITS

Particulars	Amount	Amount
A.1 Demand Deposits	428.02	536.77
(I) From Bank	0.00	0.00
(II) From Others	428.02	536.77
2. Savings Bank Deposits	1888.67	1892.95
3. Term Deposits	7790.62	7467.54
(I) From Bank	0.00	0.00
(II) From Others	7790.62	7467.54
Total (1+2+3)	**10107.31**	**9897.26**
B.(I) Deposits of branches in India	**10107.31**	**9897.26**
(II) Deposits of branches outside india	0.00	0.00
Total (I+II)	10107.31	**9897.26**

Schedules - 4 Borrowings

Particulars	Amount	Amount
I. Borrowing in india	0.00	0.00
(I) Reserve Bank of India (LAF)	0.00	0.00
(ii) Other banks	0.00	0.00
(iii) Other institutions and agencies	0.00	0.00
(iv) Other long Term (Subordinated deposits (LDT)	0.00	0.00
II. Borrowings Outside india	0.00	0.00
Total (I&II)	0.00	0.00

Secured borrowings included I and II Above Rs Lacs (Last year Rs Lacs)

Schedules - 5 Other Laibilities and Provisions

Particulars	Amount	Amount
I. Bills payable	0.77	3.70
II. Inter-office adjustments (Net)	0.00	0.00
III. Interests accrued	661.27	603.09
IV Others (including Provisions)	77.78	101.54
Total	**739.82**	**708.33**

Schedules - 6 Cash And Balances With Reserve Bank of

Particulars	Amount	Amount
I. Cash in hand (Including foreign Currency notes)	88.96	169.92
II Balance with Reserve Bank of India	0.00	0.00
(I in Current Account	0.00	0.00
(ii) in other Account	0.00	0.00
Total (I&II)	**88.96**	**169.92**

Schedules - 7 Balance With Banks And Money At Call Short Notices

Particulars	Amount	Amount
I. In India	1499.75	1586.84
I. Balances with banks	1499.75	1586.84
a. In Current Accounts	358.95	371.84
b. In Other Deposit Accounts	1140.81	1215.00
II. Money at call and short notice	0.00	0.00
a. With banks	0.00	0.00
b. With other institutions (RBI LAF)	0.00	0.00
Total (i&ii)	**1499.75**	**1586.84**
II. Outside Accounts	0.00	0.00
I . in Current Accounts	0.00	0.00
I. In Other Deposit Accounts	0.00	0.00
II. Money at call and short notice	0.00	0.00
Total (i&ii) Grand Total	**1499.75**	**1586.84**

Schedules - 8 Investment

Particulars	Amount	Amount
I Investment in india in	3863.93	3864.55
I Government Securities	3855.93	3856.55
ii. Other approved securities	0.00	0.00
iii. Shares	8.00	8.00
iv. Debentures and Bonds	0.00	0.00
v. Subsidiaries and / or Joint Ventures	0.00	0.00
vi. Others (SRs issued by ARCs)	0.00	0.00
Total	**3863.93**	**3864.55**
ii. Investment outside in India in	0.00	0.00
I Government Securities (including	0.00	0.00
Local authorities	0.00	0.00
ii Subsidiaries and / or Joint Ventures	0.00	0.00
iii. Other Investments (to be specified)	0.00	0.00
Total	0.00	0.00
Grand Total (I&II)	**3863.93**	**3864.55**

Schedules - 9 Advances

Particulars	Amount	Amount
A I Bills purchased and discounted	0.00	0.00
ii) Cash credits, overdrafts and loans repayable Guarantees	1689.84	1733.82
iii) Term Loans	4780.62	4234.66
Total	**6470.46**	**5968.48**
B. I Secured by tangible assets	5845.71	5306.52
ii) Covered by Bank / Government Guarantees	0.00	0.00
iii) Unsecured	624.75	661.96
Total	624.75	661.96
C.i. Advances in india	6470.46	5968.48
I priority Sectores	4883.4	4495.59
ii Public Sector	0.00	0.00
iii Banks	0.00	0.00
iv Others	1587.06	1472.89
C.ii Advances Outside India	0.00	0.00
I Due form Banks	0.00	0.00
ii) Due form Other	0.00	0.00
a) bills purchased and discounted	0.00	0.00
b) syndicated loans	0.00	0.00
c) Others	0.00	0.00
Total	**6470.46**	**5968.48**
Grand Total (C.I.&C.II)	**6470.46**	**5968.48**

Schedules - 10 Fixed Assets

Particulars	Amount	Amount
A Premises (including land)	0.00	0.00
Gross Block	0.00	0.00
At cost on 31 st march of the preceding year	47.57 0.00	48.79 0.00
Additions during the year		

Schedules to the Financial Statements

(Rs. In Lakhs)

Deductions during the year	0.00	0.00
Total	47.57	**48.79**
Depreciation	0.00	0.00
As at 31 st March of the preceding	0.00	0.00
year	0.00	0.00
Charge for the year	0.00	0.00
on deductions during the year	1.19	1.22
Total	1.19	**1.22**
Net block (A)	46.38	47.57
B. Other Fixed Assets	0.00	0.00
(including furniture and Fixtures)	0.00	0.00
Gross Block	0.00	0.00
At cost on 31 st march of the preceding year	57.21	31.92
Additions during the year	5.90	36.15
Deductions during the year	0.00	0.00
Total	63.11	**68.07**
Decrepitation	0.00	
As at 31 st March of the preceding year Charge for the year	11.75	10.34
on deductions during the year	0.00	0.53
Total	11.75	10.87
Net block (B)	**51.36**	**57.20**
C. Net block (C=A+B)	**97.74**	**104.77**

Schedules - 11 Other Assets

Particulars		
I Inter-office adjustment (net)	0.00	0.00
ii. Interest accrued	628.71	600.25
iii. Tax paid in advance / tax deducted at source (TDS)	10.00	30.00
iv. Stationery and Stamps	0.00	0.00
v. Non banking assets acquired in satisfaction of claims	0.00	0.00
vi. Others	16.83	36.72
Total	**655.54**	**666.97**

Schedules - 12 Contingent Liabilities

Particulars		
I. Claims against the bank not acknowled as debts	0.00	0.00
II. Liability for partly paid investments	0.00	0.00
III. Liability on account of out standing forward exchange contracts	0.00	0.00
iv. Guarantees given on behalf of constituents	0.00	0.00
a) In India	0.00	0.00
b) outside India	0.00	0.00
V. Acceptances, endorsements and other obligations	0.00	0.00
Vi. Other items for which the bank is contingently liable(DEAF)	15.23	14.36
Total	**15.23**	**14.36**

Schedules - 13 Interest Earned

Particulars	Amount	Amount
I Interest / discount on advance / bills	681.81	691.64
ii. Income on investments	329.41	305.14
iii. interest on balance with Reserve Bank of India and other inter-bank funds	0.00	0.00
iv. Others	0.00	0.00
Total	1011.22	**996.78**

Schedules - 14 Other Income

Particulars	Amount	Amount
I. Commission, exchange and brokerage	0.58	0.75
ii. Profit on sale of investments Less : Loss on sale of investments	0.00	0.00
iii Profit on revaluation of investments	0.00	0.00
iv. Profit on sale of land buildings and other assets	0.05	0.08
Less : Loss on sale of land building and other assets	0.00	0.00
v. Profit on exchange transactions	0.00	0.00
Less : Loss on exchange transactions	0.00	0.00
vi. Income earned by way of devidends etc. from subsidiaries /companies / in india	0.80	0.80
vii NPA Provision written Back	0.00	0.00
viii Deffered Tax Assets (DTA)	0.00	0.00
ix. Miscellaneous Income	40.16	37.40
Total	**41.59**	**39.03**

Note : Under items II to V loss figures may be shown in brackets.

Schedules - 15 Interest Expended

Particulars	Amount	Amount
I. Interest on deposits	581.69	533.56
ii. Interest on Reserve Bank of India/ Inter bank borrowings	0.00	0.00
iii. Others	0.83	0.91
Total	**582.52**	**534.47**

Schedules - 16 Operating Expenses

Particulars	Amount	Amount
I Payments to and provisions for exployees	177.80	197.10
ii. Rent, taxes and lighting	29.19	28.85
iii. Printing and Stationery	1.87	2.25
iv. Advertisement and publicity	0.83	1.58
v. Depreciation on bank's property	12.52	11.56
vi. Director's fees, allowances and expenses	3.16	3.05
vii. Auditors fees and expenses (including branch auditors)	4.76	9.49
viii. Law charges	0.22	0.86
ix. postages Telegrams & Telephons ect	2.34	2.99
x. Repairs and maintenance	0.24	0.86
xi. Insurance	15.57	16.76
xii. Other expenditure	79.27	74.36
xiii. Loss on NON SLR Bonds	0.00	0.00
Total	**327.77**	**349.71**

Schedules to the Financial Statements

(Rs. In Lakhs)

Schedules - 17 Provisions And Contingencies

Particulars	Amount	Amount
I Band Doutful Debts Reserve (BDDR) Provision	0.00	9.20
ii. Provision against Standard Assets	0.00	11.00
iii.Provision for Standard Account (COVID-19)	0.00	0.00
iv. Provision for Resolution Framework	0.00	0.00
v.Provision for Restrutured for Advances (COVID-19)	0.00	0.00
vi. Investment Depredation Reserve Provision	0.61	0.61
Vii Provision for Income Tax	61.10	46.18
Viii Short Provision for Income Tax FY 2022-23	0.00	0.00
ix. Special Reserve Under Income Tax	00.00	10.00
x. Provision for Non-Performing Investment	0.00	0.00
xi. Provision for ARC Security Receipts	0.00	0.00
Total	**61.71**	**76.99**

Sou. S. U. Suryavanshi
Chairman

Smt. M. V. Shinde
Vice- Chairman

Shri. J. K. Kumbhar
General Manager

Shri. N. V. Kadam
Accountant

M/s J.P. Chougule & Co.
Chartered Accountant
FRN - 115458 W
UDIN 25129324BMLFHX5912

Board of Directors

Sou. M. S. Damame
Smt. J. R. Nimbalkar
Smt. B. B. Dongale
Sou. S. P. Patil (Koulavkar)
Sou. M. J. Ghotane
Smt. J. A. Parmale
Sou. P. M. Dharamadhikari
Sou. S. B. Dongale
Smt. T. M. Bhosale
Sou. S. P. Indulkar
Sou. Shubhangi Sushindran (Bhosale)
Smt. M. N. Sutar
Sou. V. B. Jadhav

आमच्या बँकेच्या
बिंदू चौक, राजारामपुरी, गांधीनगर, पट्टणकोडोली, खासबाग व शाहूपुरी या शाखांकडे
लॉकर्स उपलब्ध आहेत.

सन २०२५-२०२६ करीता खर्चाचे अंदाजपत्रक

अ.नं.	खर्च तपशील	सन २४-२५ मंजूर बजेट	सन २०२४-२५ चा प्रत्यक्ष खर्च	सन २०२५-२६ करीता सुचविलेले बजेट
१	सेवक पगार भत्ते बोनस भ. नि.	२१००००००,००	१७७८००३०.७२	२१००००००,००
२	संचालक मंडळ मिटींग भत्ता	३५००००,००	३१६१६०,००	५०००००,००
३	भाडे, कर व दिवाबत्ती	५००००००,००	४४७५६१०.४६	४६०००००,००
४	टपाल तार व दूरध्वनी	३०००००,००	२३४१२९.८०	३०००००,००
५	स्टेशनरी छपाई व जाहिरात	४०००००,००	२७०८७३.३५	३५००००,००
६	हिशोबतपासणी फी	९५००००,००	४७६०००,००	९०००००,००
७	झीज व दुरुस्ती	१५०००००,००	१२७५६३८.८०	१५०००००,००
८	शुभलक्ष्मी कमीशन	२००००००,००	२२२७६८५.१६	२४०००००,००
९	किरकोळ खर्च व आदर सत्कार	३०००००,००	२१४९२४,००	३०००००,००
१०	वार्षिक सभा खर्च	१५००००,००	१२७५४२.१०	१५००००.००
११	शिपाई ड्रेस	४००००,००	३१६९३.३२	४००००,००
१२	प्रवास खर्च	७५०००,००	८५३१,००	५००००,००
१३	टंकलेखन खर्च	७००००,००	५५६४८,००	७००००,००
१४	वृतपत्र वर्गणी खर्च	२५०००,००	२४७७०,००	३००००,००
१५	इतर खर्च	४०००००,००	६१४६६०.६८	७२००००,००
१६	बँक फेड/असो. वर्गणी	७५०००,००	५००००,००	७५०००,००
१७	कायद्याबाबतचा खर्च	१०००००,००	२२०७०,००	१०००००,००
१८	पुस्तक खरेदी व ग्रंथालय	२५००,००	०,००	२५००,००
१९	सेवक/संचालिका प्रशिक्षण खर्च	१५००००,००	३२९८५,००	१५००००,००
२०	भ.नि.नि./विमा/सेवाशुल्क	१५००००,००	११३६३७,००	१५००००,००
२१	संगणक खर्च	२५०००००,००	३३४३०८६.५६	३५०००००,००
२२	पाणी बील	३५०००,००	४३६००,४०	५००००,००
२३	पोष्ट बॉक्स भाडे	५००,००	३००,००	५००,००
२४	लेबर वेलफेअर फंड	५०००,००	१६५०,००	५०००,००
२५	वाहन दुरुस्ती	४००००,००	४०४१४.१२	५००००,००
२६	शॉप अँक्ट लायसन फी	१००००,००	१५००,००	१००००,००
२७	सभासमारंभ	१०००००,००	११२२०,००	१०००००,००
२८	वसुली खर्च	२५०००,००	०,००	२००००,००
२९	राईट ऑफ	५००००,००	१६६०१,००	५००००,००
३०	सेवाकर/जीएसटी	१२०००००,००	३९२३६४.५३	६०००००,००
३१	वकील फी	२००००,००	०,००	२००००,००
३२	पेट्रोल/डिझेल खर्च	२१००००,००	१९५७२५,००	२५००००,००
३३	एटीएम चार्जिस	३००००,००	०,००	३००००,००
३४	एंटरचेंज फी	३०००००,००	३६९७०३.९१	५०००००,००
३५	निवडणूक खर्च	०,००	०,००	०,००
३६	मुख्यमंत्री सहाय्यता निधी	५१०००,००	०,००	५१०००,००
३७	क्लिअरींग चार्जीस	१००००,००	४४३.९२	१००००,००
	एकूण	३७६२४०००,००	३२७७७११९.६३	३८६३४०००,००

☞ सायबर गुन्हेगारीच्या तक्रारीसाठी १९३० वर संपर्क साधा अथवा cybercrime.gov.in या लिंक वर तक्रार दाखल करा.

शासकीय लेखापरिक्षकांचा अहवाल

(महाराष्ट्र सहकारी कायद्याच्या कलम ८१ (५) (ब) व नियम ६९ नुसार)

आम्ही सोबत जोडलेल्या कोल्हापूर महिला सहकारी बँक लि. कोल्हापूर या बँकेच्या ३१ मार्च २०२५ अखेरचा एकत्रीत ताळेबंद(प्रधान कार्यालय व ७ शाखा) व त्या दिवशी संपणाऱ्या आर्थिक वर्षाचे एकत्रीत नफातोटापत्रकाचे लेखापरिक्षण केलेले आहे. सदरची आर्थिक पत्रके ही बँकेच्या व्यवस्थापनाने बनविलेली असून ती त्यांची जबाबदारी आहे. सदर आर्थिक लेखापरिक्षणावरुन त्यावर अभिप्राय व्यक्त करणे इतकीच आमची जबाबदारी आहे.

भारतामध्ये प्रचलीत असलेल्या लेखापरिक्षणाच्या मानदंडपद्धतीनुसार (Standard) आम्ही संस्थेचे लेखापरिक्षण केले आहे. सदरच्या आदर्श पद्धतीनुसार, संस्थेच्या आर्थिक पत्रकामध्ये कोणतेही मोठे/महत्वाचे (Material) चुकीचे विधान नाही याची रास्त खात्री करण्याच्या दृष्टीने लेखापरिक्षणाचा आराखडा करणे व लेखापरिक्षण करणे जरुरीचे असते. लेखापरिक्षणात नमुना परिक्षण पध्दतीने (Test Check) आर्थिक पत्रकातील रक्कमा व त्याचे सादरीकरण (Disclosure) या संदर्भातील पुराव्याच्या तपासणीचा समावेश असतो. लेखापरिक्षणामध्ये लेखाकर्माच्या तत्वाचा वापर व व्यवस्थापनाने केलेले महत्वाचे अंदाज याची तपासणी तसेच आर्थिक पत्रकामधील सर्वांगीण सादरीकरणाचे मुल्यांकन यांचाही समावेश असतो. लेखापरिक्षण अहवालातील मतप्रदर्शनाला पुरेसा आधार आहे अशी आमची खात्री आहे. उपरोक्त आर्थिक पत्रकाबद्दल आम्ही जोडलेल्या टिपणी व शे-यास पात्र राहून आम्ही अहवाल करतो की,

१) सदर बँकेचे प्रधान कार्यालय व सात शाखा यांचे लेखापरिक्षण आम्ही केले आहे.

२) आमच्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपुर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती माहिती व खुलासे आम्हास उपलब्ध झाले असून ती सर्व माहिती व खुलासे समाधानकारक आहेत.

३) आमच्या मते व आम्हाला मिळालेल्या माहिती व खुलाशाच्या आधारे आणि आम्ही केलेल्या व सोबत जोडलेल्या अहवालाच्या भाग अ ब व क मधील नमुद शेऱ्यास अनुसरुन संस्थेचे ताळेबंद व नफा तोटापत्रक महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० ला अनुसरुन तयार केलेले आहेत आणि आमच्या मते संपूर्ण महितीप्रमाणे तसेच आम्हास देण्यात आलेल्या खुलाशावरुन व लेखापरिक्षण अहवालाच्या भाग अ ब व क मधील नमुद शेऱ्यास अनुसरुन

अ) ताळेबंद व नफा-तोटा पत्रक संस्थेने ठेवलेल्या हिशोबपुस्तकाशी जुळते असून सदर ३१ मार्च २०२५ या दिनांकाचा ताळेबंद बँकेच्या व्यवहाराची / कामकाजाची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितो आणि नफा तोटापत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षातील नफ्याची सत्य व वास्तव्य स्थिती दर्शवितो. (लेखापरिक्षण अहवालातील नफातोटा विवेचनातील शेऱ्यास पात्र राहून व महत्वाचे शेऱ्यास पात्र राहून)

ब) संस्थेचे हिशोब हे त्यावरील टिप्पणीस पात्र राहून महाराष्ट्र सहकारी संस्थाच्या कायद्यानुसार आवश्यक ती माहिती देणारे आहेत व संस्थेच्या आर्थिक व्यवहाराची सत्य व वास्तवस्थिती दर्शवितात.

४)आमच्या मते एकत्रीत ताळेबंद बँकींग रेग्युलेशन अॅक्ट १९४९(अॅज अॅप्लीकेबल टू को-ऑपरेटिव्ह सोसायटी) चे तिसऱ्या परिशिष्टातील नमुन्याप्रमाणे कर्ज या खात्यातील पोटकलमातील माहितीसह रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नियमानुसार तयार करण्यात आला आहे.

५) आमच्या मते पुस्तकाच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पतीस येईल त्यावरुन संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचा कायदा १९६० व त्याखालील नियम व संस्थेच्या पोटनियमाप्रमाणे अपेक्षीत असल्या प्रमाणे पुस्तके ठेवली आहेत.

६) सन २०२४-२५ या वर्षाकरता महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा १९६० खालील नियमानुसार व नवीन निकषाच्या आधारे बँकेस **'अ'** वर्ग देणेत आला आहे.

मे. जे.पी.चौगले अँण्ड कंपनी
चार्टर्ड अकौंटंट
सही/-
(सी.ए.अमित एम.शिंदे) पार्टनर
(मेंबरशीप नं. १२९३२४)
(FRN115458W)
UDIN: 25129324BMLFHX5912

स्थळ :- कोल्हापूर
दिनांक : १३/०६/२०२५

शिक्का

बँकेच्या अधिकृत कर्मचाऱ्यांशिवाय आपली कोणतीही माहिती अन्य व्यक्तीस देवू नका.

जोडपत्र अ

बँकेचे नाव	कोल्हापूर महिला सहकारी बँक लि., कोल्हापूर		
मुख्य कार्यालय	१०८२ ख, बी वॉर्ड, तुतूची बाग, खासबाग कोल्हापूर - ४१६ ०१२		
ई-मेल	ho@kopmahilabank.com		
नोंदणी क्रमांक	के. पी. आर./बी.एन.के.१५७		
दिनांक	१९ मे. १९७२		
रिझर्व्ह बँक परवाना	यु.बी.डी.एम. ए. एच. ११५५ पी दि.१८ जुलै १९९५		
कार्यक्षेत्र	कोल्हापूर जिल्हा		
तपशील	दि. ३१ मार्च २०२५		
	मुख्यालयासह शाखांची संख्या	८	
सभासद	नियमित (भागधारक)	१२३३०	
	नाममात्र	६२५	
	खपलेले भागभांडवल	५१२.८०	(आकडे लाखात)
	राखीव निधी व गंगाजळी	१२३५.६६	
ठेवी	बचत (सेव्हींग्ज) ठेवी	१८८८.६७	
	चालू (करंट) ठेवी	४२८.०२	
	मुदत व इतर ठेवी	७७९०.६२	
दिलेली कर्जे	तारणी कर्जे	५८४५.७१	
	विनातारणी कर्जे	६२४.७५	
	प्राधान्यपूरक क्षेत्र	४८८३.४०	
	कर्जपुरवठा टक्केवारी	८१.७२	
	दुर्बल घटकांना कर्ज	१५२२.३३	
	कर्ज पुरवठा टक्केवारी	२५.११%	
	गुंतवणूक	५००४.७३	
	थकबाकी प्रमाण	६.८१%	
	लेखापरिक्षण वर्ग	अ	
	नफा	८०.८१	
	सेवक संख्या	५४	
	खेळते भांडवल	१२११६.९२	

ठेव विमा व ऋण हमी महामंडळ कायदा १९६१ या कायद्याप्रमाणे ठेव विमा व ऋण विमा महामंडळ यांचेकडे दि. ३०/०९/२०२५ अखेरचा हप्ता बँकेने दि. ०६/०५/२०२५ रोजी भरणा केलेला आहे.

सन २०२४ - २०२५ अखेर संचालिका व नातेवाईक यांना दिलेली कर्जे

अ.नं.	तपशील	वर्षारंभी येणे रक्कम	सहकार वर्षात मंजूर रक्कम	सहकार वर्षात परत केलेली रक्कम	सहकार वर्षाअखेर येणे रक्कम	थकबाकी
१.	संचालक कर्जे	निरंक				
२.	नातेवाईक कर्जे					